# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६०१२६४
२५६०१२६५
ई–मेलः pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ : साफुपुवि/निवदि/७८६ दिनांक : ०५/०७/२०१८

प्रति,

मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय : महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थाना शैक्षणिक वर्ष सन २०१७–१८मध्ये सौर ऊर्जा उपकरणे यासाठी देण्यात आलेल्या अर्थसहाय्य मंजुरीबाबत.

महोदय/महोदया,

महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी शैक्षणिक वर्ष सन २०१७–१८ मध्ये ऑनलाईन पध्दतीने सौर ऊर्जा उपकरणासाठी अर्थसहाय्याकरिता प्रस्ताव दाखल केलेले होते. सदरील प्रस्तावांस या कार्यालयाच्या परिपत्रक क्र.साफुपुवि/निवदि/१००८, दिनांक २५.११.२०१७ नुसार तत्वतः मान्यता देण्यात आलेली होती.

सदरील परिपत्रकात उल्लेख केल्याप्रमाणे सौर ऊर्जा उपकरणे बसविण्यापूर्वी संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेची प्रत्यक्ष पाहणी करुन त्यासंबंधीचा अहवाल इत्यादिसाठी ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी रु.५,०००/– विद्यापीठाच्या वित्त विभागाकडे जमा केलेले आहेत अशा संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांना आंतरशास्त्र अभ्यास ऊर्जा प्रणाली विभागाने प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केलेली आहे व ज्या महाविद्यालये/परिसंस्थांचा पाहणी अहवाल सकारात्मक आलेला आहे अशा २७ महाविद्यालये/परिसंस्थांची यादी सोबत जोडत आहे. सदरील २७ महाविद्यालये/परिसंस्थांनी सौर ऊर्जा उपकरणे बसविण्याची कार्यवाही पुढील प्रमाणे दिलेल्या सूचना विचारात घेवून करण्यात यावी.

१. महाविद्यालये/परिसंस्थेस सौर ऊर्जा उपकरणे बसविण्याकरिता सोबत जोडलेल्या अधिकृत पुरवठादार यादीमधील पुरवठादारांकडून शासनाने खरेदी प्रक्रिये संदर्भात जे नियम केलेले आहेत त्याप्रमाणे निविदा मंजूर करून त्यावर प्राचार्यांची सही व शिक्का घेवून त्यानंतरच पुढील कार्यवाही करावी.

२. महाविद्यालये/परिसंस्थेस सौर ऊर्जा उपकरणे बसविण्याकरिता सोबत जोडत असलेल्या मार्गदर्शकतत्वांचा अवलंब करुन कार्यवाही करावी. (सोबत मार्गदर्शकतत्वे)?

३. सोबत जोडत असलेल्या अधिकृत पुरवठादार यादीमधील मंजूर पुरवठादारांशीच संपर्क साधून सौर ऊर्जा उपकरणे बसविणे. अधिकृत पुरवठादारांव्यतिरिक्त इतर पुरवठाधारकांकडून उपकरणे बसविल्यास उचल रक्कम व्याजासह विद्यापीठास परत करावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी. (सोबत अधिकृत ५९ पुरवठादारांची यादी)

४. सौर ऊर्जा उपकरणे अर्थसहाय्याची विद्यापीठ संकेतस्थळावरील मंजूर यादी हीच अंतिम मंजूरी समजण्यात यावी. मंजूरीची स्वतंत्र पत्रे पाठविली जाणार नाहीत.



S. B. PATIL INSTITUTE OF MANAGEMENT NIGDI PRADHIKARAN PUNE-44

Director
S. B. Patil Institute of Management
Sector No. 26, Nigdi,
Pradhikaran, Pune-411 044.

Scanned by CamScanner

५. सौर ऊर्जा उपकरणें बसविण्याकरिता उचल रक्कम महाविद्यालये/परिसंस्थेच्या खात्यावर NEFT व्दारे अदा करण्यात येणार असल्याने महाविद्यालये/परिसंस्थेने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लॉगीन करुन खालील नमूद केलेली माहिती ऑनलाईन पध्दतीने भरावी व त्याची हार्ड कॉपी व महाविद्यालये/परिसंस्थेच्या बॅंक खात्याच्या धनादेशाची स्कॅन कॉपी त्यासोबत जोडून उचल मागणी विनंती अर्ज व हमीपत्रासह (सोबत नमुना) नियोजन व विकास विभागामार्फत वित्त व लेखा विभागास दोन प्रतीमध्ये सादर करावी. त्यानंतर उचल रक्कम देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

१. महाविद्यालये/परिसंस्थेचे नाव (महाविद्यालये/संस्थेच्या बॅंक पासबुकावरील नोंदीनुसार)
२. बॅंक खाते क्रमांक
३. बॅंक खात्याचा प्रकार : चालू / बचत
४. आयएफएससी कोड
५. बॅंकेच्या शाखेचे नाव

६. महाविद्यालये/परिसंस्थेची इमारत/जागा स्वत:ची अथवा दीर्घ मुदतीच्या (कमीत कमी २५ वर्षे) भाडेकरारावर आहे यासंबंधीचे हमीपत्र संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेस परिसंस्थेच्या सेक्रेटरी किंवा अध्यक्ष व प्राचार्य/संचालक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने सादर करावे लागेल.

७. आपल्या महाविद्यालये/परिसंस्थेने बांधकामासाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ पूर्वी जर उचल रक्कम घेतलेली असेल आणि मार्गदर्शकतत्वांप्रमाणे दोन वर्षात बांधकाम पूर्ण केलेले नसेल किंवा बांधकामपूर्णत्वाचे अंतिम हिशोब सादर केलेले नसतील अशी सर्व महाविद्यालये/परिसंस्था सौर उर्जा उपकरणांच्या अर्थसहाय्यास अपात्र राहतील.

८. महाविद्यालये/परिसंस्थेने सादर केलेल्या प्रस्तावात नमूद केलेली माहिती खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा मार्गदर्शकतत्वांचे तंतोतंत पालन न केल्यास सदरील अर्थसहाय्य रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठ कार्यालयाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

९. महाविद्यालये/परिसंस्थेने दिलेल्या पुरवठादाराकडून सौर ऊर्जा उपकरणे बसविल्यानंतर आंतरशास्त्र अभ्यास ऊर्जा प्रणाली विभागाकडून काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयकाची अंतिम रक्कम अदा केली जाईल.

१०. सौर ऊर्जा उपकरणे बसविल्यानंतरची सर्व जबाबदारी, उदा. देखभाल व दुरुस्ती इत्यादि संबंधित महाविद्यालये/संस्थेची राहील.

११. विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेले निर्णय व नियमातील बदल सर्व महाविद्यालय/परिसंस्थावर बंधनकारक राहतील.

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास

सोबत : वरीलप्रमाणे.

S. B. PATIL INSTITUTE OF MANAGEMENT NIGDI PRADHIKARAN PUNE-44

Director
S. B. Patil Institute of Management
Sector No. 26, Nigdi,
Pradhikaran, Pune-411 044.

Scanned by CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | (CRS171455001) [CAAP014550] Gurudatta Gramvikas Pratishtan College of BBA,BCA,BCS & B.Com Addr: Jategaon Bk Tal-Shirur Dist-Pune Tal: Shirur Dist: Pune | 500000 | Visited | Yes |
| 9 | 24 | (CRS171020002) [CAAP010200] J.T.S.S.P. Mandal Junnar Shri Shiv chatrapati College Addr: Bodke Nagar Tal: Junnar Dist: Pune | 500000 | Visited | Yes |
| 10 | 6 | (CRS171573001) [CEGP015730] JAIHIND COMPREHENSIVE EDUCATIONAL INSTITUTE Jai Hind College OF Engineering Addr: GAT NO 441 KURAN TAL JUNNAR DIST PUNE Tal: Junnar Dist: Pune | 500000 | Visited | Yes |
| 11 | 19 | (CRS171264001) [CPHP012640] Jayawant Shikshan Prasarak Mandal Jayawantrao Sawant College of Pharmacy and Research Addr: Handewadi Road, Hadapsar Pune Tal: Pune (corporation Area) Dist: Pune | 500000 | Visited | Yes |
| 12 | 28 | (CRS171004001) [CAAP010040] Maharashtra Education Society Abasaheb Garware Mahavidyalay Addr: Karve Road Tal: Pune (corporation Area) Dist: Pune | 500000 | Visited | Yes |
| 13 | | (CRS171080001) [IMMP010800] Modern Education Society Neville Wadia Institute of Management Studies & Research Addr: 19 Prin V K Joag path, Wadia college campus Pune-1 Tal: Pune (corporation Area) Dist: Pune | 500000 | Visited | Yes |
| 14 | 7 | (CRS171389001) [CEGP013890] Nutan Maharashtra Vidya Prasarak Mandal Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology Addr: Vishnupuri, Talegaon Dabhade, Tal - Maval, Dist - Pune Pincode:410507 Tal: Mawal Dist: Pune | 500000 | Visited | Yes |
| 15 | 8 | (CRS171514003) [IMMP015140] Pimpri Chinchwad Education Trust S. B. Patil Institute Of Management Addr: Sector 26, Pradhikaran, Nigdi, Pune -411044 Tal: Pimpari Chinchwad (corporation Area) Dist: Pune | 500000 | Visited | Yes |
| 16 | 10 | (CRS171167002) [CAAP011670] Rajmata Jijau Shikshan Pasarak Mandal Arts, Commerce and Science College Addr: Landewadi,Bhosari Tal: Pimpari Chinchwad (corporation Area) Dist: Pune | 500000 | Visited | Yes |



S.B. PATIL INSTITUTE OF MANAGEMENT NIGDI PRADHIKARAN PUNE - 44

Director
S. B. Patil Institute of Management
Sector No. 26, Nigdi,
Pradhikaran, Pune-411 044.

Scanned by CamScanner